N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0750 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/12/2021 03:26 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 04/12/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/12/2021

**Time From (वेळेपासून):** 17:20 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:21 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/12/2021 **Time (वेळ):** 02:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 008 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/12/2021 03:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सदर बझार पोलीस स्टेशन ,अर्जशाखा रूमच्या समोर ,सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गजानन चंद्रकांत आलुरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 44,शिवगंगा नगर, भाग- 2,शेळगी,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 44,शिवगंगा नगर, भाग- 2,शेळगी,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8830027002

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्जेराव शंकर पाटील | | | 1. सदर बझार पोलीस ठाणे,सोलापूर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 04.12.2021 मी गजानन चंद्रकांत आलुरे, वय - 38 वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा. प्लट नं. 44, शिवगंगा नगर, भाग- 2, शेळगी, सोलापूर मोबाईल नंबर 8830027002 समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस असुन सोलापूर महानगर पालिका हद्दीतील पार्कचौक येथील हुतात्मा स्मृती शपिंग सेंटर येथील गाळा नं. 14 हा माझे मालकीचा असुन सदर ठिकाणी फोर जी चहा कन्टीन चालवुन त्यावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.माझ्या चहा कन्टीनच्या लगतच गाळा नं 15 श्रीमती गायत्री गणेश शेटे व प्रसाद विजय शेटे यांच्या मालकीचा असुन सदर गाळा मला माझ्या चहाच्या व्यवसायासोबत पानटपरी चालु करण्याकरीता श्रीमती गायत्री गणेश शेटे यांच्याकडुन नोटरी भाडेकरार करुन दि. 01/04/2021 रोजी पासुन पुढील 03 वर्षे मुदतीकरीता 36000 रुपये डिपझिट व 9000 रुपये मासिक भाडे असा करार करुन घेतलेला होता व तेंव्हा पासुन सदर गाळयाचे मी नियमित मासिक भाडे श्रीमती गायत्री गणेश शेटे यांना देत होतो. परंतु दि. 18/09/2021 रोजी श्रीमती गायत्री गणेश शेट आणि त्यांची मुले प्रसाद शेटे व कुणाल शेटे यांनी मला न कळविताच माझ्या गैरहजेरीत माझ्या ताब्यात असलेल्या गाळा नं. 15 चे परस्पर कुलुप तोडुन दुकानातील सामान, पान मटेरीयल असे 32000 रुपये किंमतीचे साहीत्य व 400 रुपये रोख रक्कम घेवुन सदर दुकानास त्यांचे कुलुप लावुन निघुन गेले. त्याअनुषंगाने मी दि. 06/10/2021 रोजी सदरबझार पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दाखल केला होता. सदर चा अर्ज हा सदर बझार पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सर्जेराव पाटील यांच्याकडे चौकशी करीता होता. परंतु त्यांनी सदर अर्जावर श्रीमती गायत्री शेटे व त्यांच्या मुलांवर कोणतीही कार्यवाही केली नाही. मी श्रीमती गायत्री शेटे व त्यांच्या मुलांन विरुध्द पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज केल्यामुळे दि. 31/10/2021 रोजी ते तिघे पुन्हा माझे चहाचे टपरीवर येवुन मला शिवीगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकी देवु लागने त्यामुळे मी सदरबाबत सदर बझार पोलीस ठाणे येथे श्रीमती गायत्री शेटे व त्यांची मुले प्रसाद व कुणाल यांच्याविरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल केला होता. त्याचा राग मनात धरुन श्रीमती गायत्री शेटे यांनी देखील माझ्या विरुध्द व माझे मित्र संजय घोलप यांच्याविरुध्द पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्याकडे खोटा तक्रारी अर्ज केला होता. सदरचा अर्ज सदर बझार पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सर्जेराव पाटील यांचेकडे चौकशी करीता असुन सदर अर्जामध्ये मला व मित्र घोलप यांना समजपत्र देवुन दि. 25/11/2021 रोजी जबाब देणकामी बोलाविले होते. त्यावर मी सदर प्रकरणामध्ये जबाब देणेकामी दि. 30/11/2021 रोजी गेलो होतो. परंतु सदर दिवशी पाटील यांनी माझा जबाब न घेता शनीवार दि. 04/12/2021 रोजी बोलाविले होते. त्यामुळे मी आज दि. 04/12/2021 रोजी सकाळी जबाब देणेकामी सदर बझार पोलीस ठाणे येथे गेलो असता पाटील यांनी श्रीमती गायत्री शेटे यांनी केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने माझा जबाब नोंदविला. सदरवेळी मी पाटील यांना सदरची तक्रार ही खोटी असल्याबाबत सांगीतले असता पाटील यांनी मला या अर्जामध्ये सहकार्य करण्याकरीता तसेच माझ्यावर कोणतीही कारवाई न करण्याकरीता त्यांच्या उजव्या हाताचे पाच बोटे असे दोन वेळा दाखवुन काही तरी रक्कम द्यावी लागेल असे सांगुन संध्याकाळी 05 वा. भेटण्या करीता येण्यास सांगीतले.पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या

तक्रारी अर्जचौकशी मध्ये कोणालाही कोणतीही रक्कम द्यायची गरज नसते याबाबत मी खात्री केली असुन सदरची रक्कम ही लाचेची असल्याचे माझी खात्री झाली आहे. माझी पोलीस कर्मचारी पाटील यांना कोणतीही लाच देण्याची अजिबात इच्छा नसुन माझा व नमुद पोलीस कर्मचारी पाटील यांचेशी यापुर्वीचा कोणताही वाद विवाद तसेच पैशाच्या देवाणघेवाणीचा कोणताही व्यवहार प्रलंबित नाही मला पोलीस कर्मचारी पाटील यांना लाच स्वरुपात कोणतीही रक्कम द्यायची इच्छा नाही. म्हणुन मी नमुद पोलीस कर्मचारी सर्जेराव पाटील, सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर याचे विरुध्द तक्रार देण्याकरीता दि. 04/12/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो व आपण त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी अशी विनंती केली.सदर लाचेच्या रक्कमेसंदर्भात बोलण्यासाठी पोलीस कर्मचारी पाटील यांनी मला दिनांक 04.12.2021 रोजी 05.00 वा. सदर बझार पोलीस ठाणे येथे बोलावले असल्याने मी दिनांक 04.12.2021 रोजी 04.00 वा. च्या सुमारास मी अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कार्यालयात येवून तेथे श्री. उमाकांत महाडिक, पोलीस निरीक्षक यांच्या समक्ष लेखी तक्रार नोंदवली. सदर तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी श्री. उमाकांत महाडिक यांनी श्री. सुधीर सुर्यकांत फुलारी, पद - कनिष्ठ सहायक, शिक्षण विभाग (प्रा.), जिल्हा परिषद सोलापूर व संतोष कृष्णात शिंदे, पद- कनिष्ठ सहायक, शिक्षण विभाग (प्रा.), जिल्हा परिषद सोलापूर, यांना पंच म्हणून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांचेकडून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी संमती घेण्यात आली. सदर पंचाची ओळख करून घेतल्यानंतर सापळा अधिकारी पोनि महाडिक यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचांसमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. तसेच सापळा अधिकारी पोनि महाडिक यांनी मी त्यांच्याकडे दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर दोन्ही पंचांनी व पोनि महाडिक यांनी वाचून सह्या केल्या. त्यानंतर पोनि महाडिक यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी सुचना दिल्या की, मी व माझ्या सोबत पंच नं 1 श्री. सुधिर फुलारी असे सदर बझार, पोलीस स्टेशन येथे जावून पोलीस कर्मचारी सर्जेराव पाटील यांची भेट घेवून माझे विरुध्द श्रीमती गायत्री शेटे यांनी दाखल केलेल्या तक्रारी अर्जाबाबत चर्चा करावी. त्यावेळी पाटील यांनी लाचेची मागणी केल्यास त्यामध्ये तडजोड करावी व सध्या पैसे आणले नसुन नंतर आणून देत असल्याबाबत सांगावे. तसेच मला व दोन्ही पंचांना व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर मला व पंच 1 फुलारी यांना सदर बझार पोलीस स्टेशन येथे पाठविण्यासाठी माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर शर्टचे आतील बाजूस अडकावून माझ्याकडील दुचाकी होन्डा कंपनीची अँक्टीवा वाहन क्रमांक एम.एच. 41 बीडी 4532 वरुन 17.20 वा. चे सुमारास पाठवले. त्याप्रमाणे मी व पंच नं 1 श्री. सुधिर फुलारी असे दुचाकी वाहनावरुन सदर बझार पोलीस स्टेशन सोलापूर येथे जावून तेथे पोलीस कर्मचारी पाटील यांची पंच सुधिर फुलारी यांच्या समक्ष भेट घेण्याकरिता पोलीस कर्मचारी पाटील हे ज्या ठिकाणी बसतात त्या खोलीत जावुन पाहिले असता तेथे ते नव्हते. त्यामुळे मी माझा मोबाईल क्रं. 8830027002 वरुन पाटील यांचा मोबाईल क्रं. 9923320663 यावर फोन लावुन पाटील साहेब मी पोलीस स्टेशन येथे आलो असे सांगीतले असता पाटील यांनी येतो असे सांगीतले. त्यामुळे मी व पंच नं 1 श्री. फुलारी असे पाटील यांच्या खोलीच्या बाहेर थांबलो. त्यानंतर काहीवेळाने पाटील हे त्यांच्या खोलीकडे आले. त्यांच्या पाठीमागे मी त्यांच्या खोलीत जावुन तेथे असलेल्या बाकडयावर बसलो व पंच फुलारी हे खोलीच्या बाहेर दरवाज्यात थांबले तेथे मी पाटील यांना माझ्याविरुध्द केलेली तक्रार खोटी असल्याबाबत सांगीतले असता त्यावर पाटील यांनी सर्व कामाचे मिळुन 10000 रुपयांची मागणी केली त्यावर मी सकाळी तर तुम्ही हाताच्या इशा-याने 500 रुपये सांगीतले होते असे म्हणालो असता पाटील यांनी 500 नाही 5000 रुपये सांगीतलो होतो असे सांगीतले. आणि तुझ्या सर्व कामाचे 10000रूपये लागतील असे सांगीतले त्यावर मी 10000रूपये जास्त होतात 4000 रुपये घ्या अशी विनंती केली असता त्यांनी 5000रुपये दे असे सांगीतले. त्यावर मी आज एवढे पैसे नाहीत त्यामुळे आज 2000 रुपये देतो आणि सोमवारी बाकीचे 3000 रुपये देतो असे सांगीतले असता त्यास पाटील यांनी होकार देवुन घेवुन येण्यास सांगीतलेने मी व पंच 1 श्री. सुधिर फुलारी असे दोघेजन परत अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात 18.38 वा. चे सुमारास परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकर्डर काढून तो बंद करून पंच श्री. सुधिर फुलारी व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी व्हईस रेकर्डर लपटपला लावुन त्यामध्ये माझ्यात व पाटील यांच्यात रेकर्ड झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये श्रीमती गायत्री शेटे यांनी माझ्या विरुध्द दाखल केलेल्या तक्रारी अर्जामध्ये माझ्या बाजुने चौकशी करुन अर्ज चौकशीमध्ये सहकार्य करण्याकरिता पाटील यांनी माझ्याकडे 10000 रूपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 5000 रुपयांची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता 2,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे स्पष्ट झाले. सदर बाबत वेळे अभावी सविस्तर पंचनामा करण्याची तजवीज ठेवण्यात आली. तसेच सदर पडताळणीसाठी वापरण्यात आलेले मेमरी कार्ड हे देखील सुरक्षित ठेवण्यात आले आहे. त्यानंतर दि. 04.11.2021 रोजी पोनि श्री.महाडिक,यांच्या सुचनेवरून दोन्ही पंचासमक्ष मी पोलीस कर्मचारी पाटील यांना लाचेची रक्कम देण्यासाठी 2000 रूपये (त्यात 500 रूपये दराच्या 03 नोटा व 100रुपये दराच्या 05 नोटा) हजर केले. पोनि महाडिक यांनी सापळा पथकातील अंमलदारांना तसेच पंचाना सदर नोटांचे नंबर पाहुन एका को-या कागदावर लिहुन घेण्यास सांगितले. ते पुन्हा पडताळुन त्यावर पंचानी व पोनि महाडिक यांनी सहया केल्या. सदर प्रिन्ट काढलेला कागद पोनि महाडिक यांनी स्वत:च्या ताब्यात घेतला.त्यानंतर मला व पंचांना पोनि महाडिक यांनी पुन्हा व्हईस रेकर्डर दाखवले तसेच पडताळणी कारवाईदरम्यान वापरलेले मेमरीकार्ड पुढील सापळा कारवाईकरीता वापरण्यासाठी सुरक्षीत ठेवण्यात आलेले असुन सदरचे मेमरी कार्ड व्हईस रेकर्डर मध्ये टाकण्यात आले. त्यानंतर मला व पंचांना अँथ्रासीन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगुन मी सापळयासाठी लाचेची रक्कम म्हणुन सादर केलेल्या सदर नोटांना ती पावडर लावण्याचे प्रात्यक्षीक दाखवुन सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचना देण्यात येवून लाचेची रक्कम माझ्या अंगावरील शर्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला आवश्यक सुचना देवुन पाटील यांचेविरुध्द सदर बझार, पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यासाठी पोनि महाडिक यांनी माझ्या गळ्यात व्हईसरेकर्डर अडकवून मला पंच नं 1 फुलारी यांच्यासह माझ्याकडील दुचाकीवरुन सदर बझार पोलीस ठाणेकडे 19.43 वा. चे सुमारास रवाना केले व सापळा पथक पंच क्र. 2 संतोष शिंदे यांचेसह शासकीय जीप मधून असे आमचे पाठोपाठ निघाले मी सात रस्ता येथे पोहचलो असता तेथे थांबुन माझा मोबाईल क्रं. 8830027002 वरुन पाटील यांचा मोबाईल क्रं. 9923320663 यावर फोन लावुन तुम्ही आहे ना असे विचारलो असता पाटील यांनी होकार दिला त्यावर मी दहा मिनिटात येतो असे सांगुन मी पंच फुलारी यांचेसह सदर बझार पोलीस ठाणे येथे गेलो आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच शिंदे असे सदर ठिकाणी आले व सापळा लावून थांबले. तेथे गेल्यानंतर मी व पंच नं 1 फुलारी असे पाटील बसतात त्या खोलीत जावुन पाहिले असता तेथे ते नव्हते. त्यामुळे मी पुन्हा पाटील यांना फोन करुन मी आलो इथ असे सांगीतले असता पाटील यांनी आलो दहा मिनिटात असे सांगीतले. त्यामुळे मी व पंच नं 1 श्री. फुलारी असे पाटील यांच्या खोलीच्या बाहेर थांबलो. त्यानंतर काहीवेळाने पाटील त्यांच्या बुलेटवर सदर ठिकाणी आले. तेथे पाटील हे त्यांच्या रुमच्या बाहेरच थांबुन माझ्याशी माझ्या कामाबाबत बोलत असताना मी पाटील यांना या 5000 रुपयांमध्येच सर्व करा असे सांगीतले असता पाटील यांनी साहेबांना सांगुन हा अर्ज फाईल करतो असे मला सांगुन हाताच्या इशा-याने पैश्यांबाबत विचारले असता अता 2000 रुपये आणले असल्याबाबत मी त्यांना सांगीतले त्यावर पाटील यांनी सदरची लाचेची

सदरची लाचेची रक्कम 2000 रुपये त्यांच्या बुलेटच्या डिक्कीत ठेवण्यास सांगीतले त्यांचे सांगणेप्रमाणे मी सदरची रक्कम त्यांच्या बुलेटच्या डिक्कीत ठेवले आणि त्यानंतर पुन्हा माझे कामाबद्दल बोलुन सापळा पथकास दिसेल असे लाच स्विकारलेचा नियोजीत इशारा केला.

त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच नं. 02 शिंदे यांचेसह सदर ठिकाणी येवुन पाटील यांना 20.21 वा. चे सुमारास रंगेहात पकडले. पोनि महाडिक यांनी पंचासमक्ष पाटील यांना लाचेची रक्कम 2000 रुपये बाबत विचारले असता सदरची रक्कम त्यांच्या बुलेटच्या डिक्की मध्ये ठेवले असल्याचे पाटील यांनी सांगीतले. त्यानंतर पाटील यांच्याकडुन सदर बुलेटची चावी घेवुन डिक्की उघडुन सदरची रक्कम पंच नं. 02 शिंदे यांनी ताब्यात घेवुन नोटांची सापळापूर्व पंचनाम्यात नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. त्यानंतर पाटील यांना ताब्यात घेवुन सदर बझार पोलीस ठाणे मधील अर्जशाखा रुम मध्ये नेऊन सदर रुममध्ये अंधार करुन सदर नोटांची अँ.वा. दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. सदरच्या नोटा पुराव्याकामी पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन पंच 02 शिंदे यांनी ताब्यात घेतल्या. दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष पाटील यांना त्यांचे नाव, वय, हुद्दा तसेच पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव **पोना./1174 सर्जेराव शंकर पाटील, वय 38 वर्षे, नेम. सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर सध्या रा. ब्लॉक नं. 22, रूम नं. 101, केशवनगर पोलीस लाईन, सोलापूर** असे सांगितले. त्यानंतर पाटील यांना व त्यांची बुलेट पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेत असल्याचे मला व दोन्ही पंचांना पोनि महाडिक यांनी सांगितले. त्यानंतर मी, पाटील, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने व पाटील यांच्या बुलेटवर घेवुन अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात आलो व सदरबाबत सविस्तर पंचनामा अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात दि. 05.12.2021 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक पोना./1174 सर्जेराव शंकर पाटील, वय 38 वर्षे, नेम. सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर यांनी माझे विरुध्द दाखल असलेल्या अर्जचौकशीमध्ये सहकार्य करण्याकरीता दि. 04/12/2021 रोजी 17.20 ते 18.38 वा. चे सुमारास 10000 रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 5000 लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता 2000 रुपये दि. 04/12/2021 रोजी सदर बझार पोलीस ठाणे मधील अर्जशाखा रुमच्या समोर 19.43 ते 20.21 वा. चे सुमारास स्विकारुन वैयक्तीक सांपत्तीक फायदा मिळवून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी **पोना./1174 सर्जेराव शंकर पाटील, नेम. सदर बझार पोलीस ठाणे,** यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): KAMLAKAR VASANTRAO PATIL(I (Inspector)) / POBN67115 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
कोल्हापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): KAMLAKAR VASANTRAO PATIL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN67115